# आपलं सांज सह्याद्री टाइम्स

सायं दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष २४ ■ अंक १४३ ■ बुधवार, दि.१४ ऑक्टोबर २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू. RNI No. MAHMAR/2003/10715 Website: aaplasanjsahyadritimes.com संस्थापक संपादक:संदीप काळे

Evening daily ■ Aapla Sanj Sahyadri Times ■ Chhatrapati SambhajiNagar ■ Vol.24 ■ Issue 143 ■ WEDNESDAY, 14 OCTOBER 2026 ■ Page 4 ■ Price. ₹1 ■ RNI NO.MAHMAR/2003/10715



जाहिर प्रगटन,पासपोर्टसाठी चेंज ऑफ नेम जाहिरातीसाठी संपर्क साधावा.अल्पदरात जाहिरात प्रसिद्ध केल्या जातील.

जाहिरातीसाठी संपर्क

8459270916


# दिवाळीआधी शेतकऱ्यांना ५ हजार रुपये देणार

## राज्यातील आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर; देवेंद्र फडणवीस यांचे कॅबिनेट बैठकीत निर्णय

**मुंबई,प्रतिनिधी:** महाराष्ट्रात दुष्काळाच्या झळा पाहायला मिळत आहेत. याचपार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृहावर मंत्रिमंडळाची विशेष बैठक बोलावली होती. या बैठकीत दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना ॲडवान्स देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी मोठी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केली. दुष्काळ नोव्हेंबर शेवटी जाहीर होतो. मात्र परिस्थिती बघता आपण डव्हासमध्ये दुष्काळ जाहीर केला आणि दुष्काळाबात जीआर ऑक्टोबर महिन्यात काढला. आम्हाला कल्पना आहे दिवाळी येते आहे, दिवाळी अडचणीची आहे.

दुष्काळाची कार्यप्रणाली दिवाळीआधी पूर्ण होणं कठीण आहे. दिवाळीआधी सगळी कामं होऊ शकत नाही. मात्र एकूणच सगळ्या गोष्टी विचारात घेता, आज मंत्रिमंडळाशी चर्चा केली आणि दिवाळी आधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांना अग्रीम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीआधी ५ हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील. सुमारे एक ते सव्वा कोटी



शेतकऱ्यांना मिळणार थेट खात्यात पैसे जमा होतील. ही अग्रीम मदत सुमारे ६००० कोटी रुपयांची असणार आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. राज्यात आणखी ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. आता राज्यात एकूण ३०५ तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळग्रस्त तालुक्यांत १२ सवलती मिळत राहतील. कर्जमाफीचे पैसेही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत आहेत.

पिण्याचे पाणी देणाऱ्या टँकर्सची संख्या वाढतेय. मराठवाड्यात पाणीपातळी ३ मीटरपेक्षा खाली गेली आहे. मराठवाड्यात हवे तेवढे टँकर देण्याचा निर्णय झाला आहे. पाण्याच्या टँकरचं जीपीएसद्वारे ट्रॅकिंग होणार असल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

तसेच १६ हजार बेकायदा कनेक्शन आम्ही तोडलीयत. पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यास प्राधान्य आहे, असं देवेंद्र फडणवीसांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अभिनंदन. घटनात्मक पदावर राहून सलग पंचवीस वर्षे यशस्वीरित्या जनसेवा केल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजूर झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडला ठराव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य मंत्रीगण यांच्याकडून टाळ्यांच्या गजरात ठरावाचे स्वागत आहे. शासकीय मालकीच्या छोट्या, स्वतंत्ररीत्या बांधकामास अयोग्य, चिंचोळ्या आकाराच्या, उपयुक्त आकार नसलेल्या, पोहोच मार्ग नसलेल्या भूखंडांच्या वितरणाच्या धोरणात सुधारणा करण्यास मंजुरी. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३७ व ३७ अ मधील तरतुदीत सुधारणा होणार आहे.श्री संत गजानन महाराज संस्थान, शेगांव यांना मौजे गिरडा (ता.व जि. बुलढाणा) येथील यात्रास्थळ विकासासाठी कायमस्वरूपी बांधकाम करण्यास मंजुरी. संस्थानाला यापुर्वीच वृक्षलागवडीसाठी दिलेल्या १९ हेक्टर ६ आर. जमिनीपैकी ३ हेक्टर ८१ आर जमिनीवर बांधकाम करता येणार. यामुळे भाविकांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देता येणार आहे.

# दसरा-दिवाळीत एसटीच्या जादा बसगाड्यांचे नियोजन



## पुण्यासाठी सर्वाधिक ५०, नागपूरसाठी ३०, तर मुंबई आणि नाशिकसाठीही वाढीव बस

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** दसरा आणि दिवाळीच्या सुट्यांमध्ये गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) जादा बसगाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. पुणे, मुंबई, नागपूर आणि नाशिक या प्रमुख शहरांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिलासा देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. पुणे मार्गावर सर्वाधिक ५०, नागपूरसाठी ३०, मुंबईसाठी सहा आणि नाशिकसाठी पाच जादा बसगाड्या सोडण्यात येणार आहेत. या नियोजनामुळे प्रवाशांची गर्दी विभागण्यास आणि नियमित बससेवेवरील ताण कमी करण्यास मदत होणार आहे.दसरा-दिवाळीच्या काळात शाळा-महाविद्यालयांना सुट्या असतात. त्यामुळे नोकरी, शिक्षण आणि व्यवसायानिमित्त पुणे, मुंबईसह अन्य शहरांमध्ये राहणारे नागरिक मोठ्या संख्येने आपल्या गावी परततात. सण कुटुंबीयांसोबत साजरे करण्यासाठी प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने बसस्थानकांवर गर्दी होते. अनेकदा प्रवाशांना बससाठी प्रतीक्षा करावी लागते, तर काही मार्गांवर जागा मिळविण्यासाठी धावपळ करावी लागते. ही परिस्थिती लक्षात घेऊन एसटी महामंडळाने प्रमुख मार्गांवर अतिरिक्त बसगाड्या उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

### पुणे मार्गावर सर्वाधिक बसगाड्या

पुण्यात माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रासह विविध उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मराठवाड्यातील नागरिकांची संख्या मोठी आहे. याशिवाय उच्च शिक्षणासाठी पुण्यात राहणारे विद्यार्थीही सणासुदीच्या काळात मोठ्या संख्येने घरी परततात. त्यामुळे पुणे मार्गावर प्रवाशांची विशेष गर्दी असते. ही बाब लक्षात घेऊन या मार्गावर ५० जादा बसगाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागपूर मार्गावरही प्रवाशांची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने ३० अतिरिक्त बसगाड्या उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मुंबई आणि नाशिक या मार्गांवरही प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन जादा बसगाड्या सोडण्यात येणार आहेत. मुंबईसाठी सहा, तर नाशिकसाठी पाच अतिरिक्त बसगाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. या चार प्रमुख मार्गांवर मिळून एकूण ९१ जादा बसगाड्या धावणार आहेत.

### प्रवाशांची गैरसोय टाळण्याचा प्रयत्न

सणासुदीच्या काळात नियमित बसगाड्यांमधील आसनक्षमता अपुरी पडण्याची शक्यता असते. त्यामुळे अतिरिक्त बसगाड्यांमुळे प्रवाशांना पर्यायी सुविधा उपलब्ध होईल. विशेषतः कुटुंबासह प्रवास करणारे नागरिक, विद्यार्थी आणि नोकरीसाठी बाहेरगावी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना याचा फायदा होऊ शकतो. प्रवाशांची गर्दी आणि उपलब्ध बसगाड्यांची संख्या यांचा समतोल राखून वाहतुकीचे नियोजन करण्यावर महामंडळाचा भर आहे. सणांच्या काळात प्रवाशांची संख्या वाढत असल्याने प्रमुख मार्गांवर अतिरिक्त बसगाड्या सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गर्दीचे व्यवस्थापन करून प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ करण्याचा महामंडळाचा प्रयत्न आहे.

# प्रचाराच्या व्हिडिओमध्ये धार्मिक स्थळे, चिन्हांचा वापर करू नये

## जाहिराती व व्हिडिओ तयार करताना निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवाराच्या कार्याचा आणि कर्तृत्वाचा आढावा घेणारे व्हिडिओ तयार करण्याची पद्धत सध्या प्रचलित आहे. मात्र, हे व्हिडिओ तयार करण्यापासून त्यांना आवश्यक प्रमाणन मिळविण्यापर्यंतची प्रक्रिया वेळखाऊ असू शकते. त्यामुळे प्रचाराचे व्हिडिओ तयार करतानाच भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करावे. आयोगाच्या निर्देशांनुसार प्रतिबंधित बाबी टाळल्यास व्हिडिओच्या प्रमाणनाची प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होईल, असे आवाहन ०५ – औरंगाबाद पदवीधर निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.उमेदवारांच्या प्रचारासाठी वृत्तपत्रांमधील जाहिराती, प्रचाररथांवरील व्हिडिओ, समाजमाध्यमांवरील रील्स, रेडिओ व खासगी एफएम वाहिन्यांवरील जाहिराती, बल्क एसएमएस, ध्वनिमुद्रित ध्वनिसंदेश तसेच इंटरनेट संकेतस्थळांवरील जाहिराती अशा विविध माध्यमांचा वापर केला जातो. उमेदवारांच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या संबंधित जाहिराती व व्हिडिओंचे नियमानुसार माध्यम प्रमाणन व संनियंत्रण यंत्रणेकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रमाणनासाठी व्हिडिओ सादर करण्यापूर्वी त्यामध्ये कोणत्या बाबींचा समावेश करावा आणि कोणत्या बाबी टाळाव्यात, याची माहिती घेणे गरजेचे आहे. वृत्तपत्रांमधील जाहिरातींसाठी मतदानाच्या आधीच्या शेवटच्या दोन दिवसांत संबंधित नियमांनुसार पूर्वप्रमाणन घेणे आवश्यक आहे.

**कार्यक्रम संहितेचे पालन आवश्यक**

कार्यक्रम संहितेनुसार, प्रचाराच्या व्हिडिओमध्ये अभिरुचीहीन किंवा सभ्यतेच्या विरुद्ध असलेली दृश्ये, मित्रराष्ट्रांवरील टीका, धार्मिक किंवा जातीय तेढ निर्माण करणारी दृश्ये अथवा आक्षेपार्ह शब्दांचा समावेश नसावा. तसेच अश्लील, बदनामीकारक किंवा जाणीवपूर्वक चुकीची अथवा अर्धसत्य माहिती देणारे चित्रण, हिंसेला प्रोत्साहन देणारी दृश्ये, कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणारे प्रसारण किंवा राष्ट्रविरोधी कृत्यांना प्रोत्साहन देणारी सामग्री वापरू नये.न्यायालयाचा अवमान करणारे, राष्ट्रपती किंवा न्यायपालिकेच्या सचोटीविषयी आक्षेपार्ह मजकूर असलेले अथवा राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणारे प्रसारण टाळावे. नैतिक मूल्यांना बाधा आणणारी टीका, अंधश्रद्धा किंवा भोंदूगिरीला खतपाणी घालणारे चित्रण, महिलांचे विकृत चित्रण, बालकांसंदर्भातील संहितेचे उल्लंघन करणारे प्रसारण तसेच विशिष्ट भाषिक किंवा प्रादेशिक घटकांविषयी उपरोधिक अथवा निंदनीय वृत्ती दर्शविणारी दृश्ये किंवा शब्द यांचाही समावेश व्हिडिओमध्ये करू नये. याशिवाय, सिनेमॅटोग्राफ कायदा, १९५२ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारे प्रसारण टाळावे.

***जाहिरात संहितेतील तरतुदींचे पालन करावे**

जाहिरात संहितेनुसार कोणत्याही वंश, जात, वर्ण, पंथ किंवा राष्ट्रीयत्वाचा उपहास करणाऱ्या, भारतीय राज्यघटनेचा अवमान करणाऱ्या अथवा गुन्हेगारी कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींना प्रतिबंध आहे. हिंसाचाराचे समर्थन करणाऱ्या, कायद्याचे उल्लंघन करण्यास प्रवृत्त करणाऱ्या किंवा अश्लीलतेचे उदात्तीकरण करणाऱ्या जाहिरातीही प्रसारित करू नयेत.

स्वतःच्या फायद्यासाठी राज्यमुद्रा, राज्यघटनेतील तरतुदी, राष्ट्रीय नेते किंवा राज्यातील व्यक्तींच्या नावांचा अथवा प्रतिमांचा गैरवापर करू नये. महिलांचे चुकीचे किंवा अवमानकारक चित्रण करणाऱ्या जाहिरातींनाही परवानगी दिली जात नाही. तसेच सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ आणि मादक पदार्थांच्या जाहिरातींवर प्रतिबंध आहे.

प्रचाराच्या व्हिडिओमध्ये कोणत्या बाबी टाळाव्यात ?

भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमविषयक निर्देशांनुसार प्रचारासाठी व्हिडिओ तयार करताना पुढील बाबी टाळाव्यात :

१. मंदिर, मशीद, गुरुद्वारा किंवा अन्य कोणत्याही धार्मिक स्थळांची दृश्ये वापरू नयेत.

२. इतर राजकीय पक्षांवर आरोप करण्याऐवजी उमेदवाराने स्वतः केलेल्या कामांची माहिती द्यावी.

३. एकमेकांच्या खासगी आयुष्याबाबत आरोप करू नयेत किंवा असभ्य भाषेचा वापर करू नये.

४. विरोधी पक्षांविरुद्ध आक्षेपार्ह टीका-टिप्पणी किंवा हेतुपुरस्सर आरोप करू नयेत.

५. सैन्याची किंवा सैन्य अधिकाऱ्यांची छायाचित्रे वापरू नयेत.

६. अन्य कोणत्याही देशाविरुद्ध आक्षेपार्ह आरोप करू नयेत.

७. विशिष्ट जात, धर्म किंवा पंथाविरुद्ध आरोप करणारा अथवा धार्मिक तेढ निर्माण करणारा मजकूर वापरू नये.

८. कोणत्याही व्यक्तीची मानहानी किंवा अवहेलना होईल, अशी दृश्ये अथवा मजकूर वापरू नये.

९. न्यायालयाचा अवमान होईल, असा मजकूर किंवा चित्रण करू नये.

१०. देशाच्या सार्वभौमत्वाचा किंवा राष्ट्रीय एकात्मतेचा अवमान करणारी सामग्री वापरू नये.

११. कोणत्याही व्यक्तीचे नाव घेऊन तिच्यावर हेतुपुरस्सर आरोप करू नयेत किंवा तिचा अपमान करू नये.

१२. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. याठिकाणी आपण आपल्या जाहिराती प्रमाणीत करून घेऊ शकता.प्रचारासाठी जाहिराती आणि व्हिडिओ तयार करताना भारत निवडणूक आयोगाच्या संबंधित नियमांचे व निर्देशांचे पालन करावे, असे आवाहनही विभागीय आयुक्तांनी केले आहे.

# तुतीच्या बागा कशा टिकवायच्या ?

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी पूरक उत्पन्नाचा मार्ग; पाण्याचे नियोजन, रेशीम अळीचे संगोपन आणि बाजारपेठेची हमी महत्त्वाची

**दुष्काळकळा**

» अर्चना काळे-पंडित

भाग-१२

मराठवाड्यातील शेती म्हटली की सोयाबीन, कापूस, तूर, मका आणि ज्वारी या पिकांचा प्रामुख्याने विचार होतो. मात्र, पारंपरिक पिकांबरोबरच काही भागांत रेशीम शेतीनेही शेतकऱ्यांना उत्पन्नाचा पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला आहे. हिंगोली, नांदेड, परभणी, जालना, बीड आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यांच्या विविध भागांत तुतीची लागवड करून रेशीम अळीचे संगोपन केले जाते. विशेषतः कमी क्षेत्रातून नियमित उत्पन्न मिळविण्याची अपेक्षा असलेल्या शेतकऱ्यांसाठी हा व्यवसाय महत्त्वाचा ठरू शकतो. मात्र, यंदा पावसाने ओढ दिल्याने रेशीम शेतीसमोरही पाणी व्यवस्थापनाचे आव्हान उभे राहिले आहे.रेशीम शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे यात केवळ शेतात पीक घेऊन ते विकले जात नाही, तर तुतीची लागवड, पानांची उपलब्धता, रेशीम अळीचे संगोपन आणि कोषांची विक्री अशा अनेक टप्प्यांतून उत्पन्न मिळते. त्यामुळे पारंपरिक पिकांचे नुकसान झाल्यानंतर पर्यायी उत्पन्नाचा स्रोत म्हणून या शेतीकडे पाहिले जाते. मात्र, रेशीम शेती ही दुष्काळापासून पूर्णपणे सुरक्षित नाही. तुतीच्या बागेला पाणी कमी पडले, पानांची गुणवत्ता खालावली किंवा अळीच्या संगोपनासाठी आवश्यक वातावरण राखता आले नाही, तर उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे यंदाच्या दुष्काळात रेशीम उत्पादकांना पाण्याचे काटेकोर नियोजन करावे लागणार आहे.रेशीम शेतीमध्ये तुतीच्या पानांना सर्वाधिक महत्त्व आहे. रेशीम अळीच्या खाद्याचा हा मुख्य स्रोत असल्याने पानांची गुणवत्ता आणि उपलब्धता यावर कोषांच्या उत्पादनाचे गणित अवलंबून असते. तुतीच्या बागेत नियमित वाढ होण्यासाठी जमिनीत आवश्यक ओलावा टिकविणे गरजेचे असते. पाण्याची उपलब्धता कमी झाली, तर झाडांची वाढ मंदावू शकते. पानांचे उत्पादन कमी झाल्यास अळीच्या संगोपनासाठी आवश्यक खाद्य उपलब्ध करून देणे कठीण होते.यंदाच्या पावसातील खंडामुळे अनेक भागांत जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. अशा परिस्थितीत तुतीच्या बागा असलेल्या शेतकऱ्यांनी उपलब्ध जलस्रोतांचा आढावा घेणे आवश्यक आहे. विहिरीतील पाणी किती दिवस पुरेल, सिंचनासाठी किती क्षेत्र राखता येईल आणि पाण्याचा वापर कोणत्या पद्धतीने करायचा, याचे नियोजन करावे लागेल. केवळ तुतीची बाग उभी आहे म्हणून तिचे उत्पादन पूर्वीप्रमाणेच राहील, असे गृहीत धरता येणार नाही. तुतीच्या



बागेत ठिबक सिंचनाचा वापर, जमिनीतील ओलावा टिकविण्यासाठी योग्य उपाय आणि पिकाच्या गरजेनुसार सिंचनाचे वेळापत्रक यामुळे पाण्याचा वापर अधिक कार्यक्षमतेने करता येऊ शकतो. मात्र, नेमके किती पाणी द्यायचे, याचा निर्णय जमिनीचा प्रकार, झाडांचे वय आणि स्थानिक हवामान लक्षात घेऊन करणे आवश्यक आहे. यासाठी रेशीम विभाग आणि कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरू शकते.

रेशीम शेतीत तुतीची बाग आणि अळीचे संगोपन हे परस्परांशी जोडलेले घटक आहेत. शेतात पानांचे उत्पादन कमी झाले, तर अळीला पुरेसे खाद्य देण्याचे आव्हान निर्माण होते. अळीच्या वाढीच्या टप्प्यांवर खाद्याची गुणवत्ता आणि उपलब्धता महत्त्वाची असते. त्यामुळे पाण्याअभावी तुतीच्या पानांची वाढ खुंटल्यास त्याचा परिणाम पुढील उत्पादनावर होऊ शकतो.रेशीम अळीचे संगोपन करताना स्वच्छता, तापमान, आर्द्रता आणि योग्य खाद्य व्यवस्थापन यांची काळजी घ्यावी लागते. त्यामुळे रेशीम शेतीला केवळ कमी पाण्यातून उत्पन्न देणारा पर्याय म्हणून पाहणे पुरेसे नाही. या व्यवसायासाठी तांत्रिक ज्ञान, नियोजन आणि नियमित देखभाल आवश्यक आहे. विशेषतः पहिल्यांदाच रेशीम शेती सुरू करणाऱ्या शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेतल्याशिवाय मोठी गुंतवणूक करणे टाळावे.पारंपरिक पिकांचे नुकसान झाल्यानंतर अनेक शेतकरी पर्यायी व्यवसायाचा विचार करतात. मात्र, दुष्काळाच्या काळात नव्याने तुतीची लागवड करायची असल्यास सर्वप्रथम पाण्याची उपलब्धता तपासणे आवश्यक आहे. तुतीची बाग उभारल्यानंतर तिची देखभाल आणि अळीचे संगोपन यासाठी आवश्यक साधने, जागा आणि खर्च यांचाही विचार करावा लागतो. उपलब्ध पाणी अपुरे असेल, तर मोठ्या क्षेत्रावर लागवड करण्याऐवजी तज्ज्ञांच्या सल्ल्याने मर्यादित क्षेत्रातून सुरुवात करणे अधिक व्यवहार्य ठरू शकते.रेशीम शेतीकडे केवळ पीक म्हणून नव्हे, तर शेतीपूरक व्यवसाय म्हणूनही पाहता येते. योग्य नियोजन असल्यास वर्षभरातील वेगवेगळ्या टप्प्यांवर उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध होऊ शकते. पारंपरिक शेतीत पेरणीपासून काढणीपर्यंत हवामानावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागते. रेशीम शेतीतही हवामान आणि पाण्याचा परिणाम होत असला, तरी तुतीची बाग, अळीचे संगोपन आणि कोषविक्री यांचे नियोजन करून उत्पन्नाची साखळी तयार करता येते.मात्र, यासाठी शेतकऱ्यांना बाजारपेठेची माहिती असणे आवश्यक आहे. कोषांचे उत्पादन घेतल्यानंतर त्यांची विक्री कुठे करायची, खरेदीदार कोण आहेत, बाजारात कोणत्या दर्जाच्या कोषांना मागणी आहे आणि वाहतूक खर्च किती येतो, या प्रश्नांची उत्तरे आधी मिळवावी लागतात. केवळ उत्पादन घेण्यावर भर दिला आणि विक्रीची व्यवस्था निश्चित केली नाही, तर अपेक्षित आर्थिक फायदा मिळण्यात अडचणी येऊ शकतात.महाराष्ट्राच्या रेशीम संचालनालयाने रेशीम शेतीचा विस्तार, तुती लागवड, कोष उत्पादन आणि प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यावर भर दिला आहे. राज्यात उत्पादित होणाऱ्या कोषांवर राज्यातच प्रक्रिया झाल्यास रोजगाराच्या संधी वाढविणे आणि मूल्यवर्धन करणे शक्य होऊ शकते. जालना, बीड आणि परभणी यांसारख्या जिल्ह्यांत रेशीम कोषांच्या खरेदी-विक्रीसाठी बाजारपेठ विकसित करण्याचा विचारही राज्याच्या धोरणात समाविष्ट आहे.

### शासनाच्या योजनांचा लाभ घेताना तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक

रेशीम शेतीचा विस्तार करण्यासाठी शासनाकडून विविध योजना आणि प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागाच्या माहितीनुसार, तुती आणि टसर रेशीम शेती करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांना आपले सरकार' पोर्टलवर नोंदणी करता येते. नोंदणीकृत शेतकऱ्यांना लागवडीपूर्वी आणि लागवडीनंतर प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे.रेशीम संचालनालयाने २०२५-२६ या वर्षासाठी सिल्क समग्र-२' योजनेअंतर्गत सर्वसाधारण तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गांसाठी प्रोत्साहनपर अनुदानासंबंधी शासन आदेश प्रसिद्ध केले आहेत. मात्र, अनुदानाचे स्वरूप, पात्रता, लाभाचे प्रमाण आणि अर्जाची प्रक्रिया संबंधित घटकानुसार बदलू शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील रेशीम विकास अधिकाऱ्यांकडून अद्ययावत माहिती घेऊनच गुंतवणुकीचा निर्णय घ्यावा.दुष्काळाच्या परिस्थितीत योजनांचा लाभ मिळणे महत्त्वाचे असले, तरी केवळ अनुदानाच्या अपेक्षेने रेशीम शेती सुरू करणे योग्य ठरणार नाही. पाण्याची उपलब्धता, तुती लागवडीसाठी योग्य जमीन, अळी संगोपनासाठी आवश्यक सुविधा, प्रशिक्षण आणि कोष विक्रीची व्यवस्था या सर्व बाबींचा एकत्रित विचार करावा लागेल. शेतकऱ्यांना सुरुवातीपासून तांत्रिक मार्गदर्शन मिळाल्यास चुका कमी होण्यास आणि उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यास मदत होऊ शकते.

### दुष्काळात जोखीम कमी करण्यासाठी नियोजन गरजेचे

यंदा खरीप पिकांच्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. अशा वेळी रेशीम शेतीसारख्या पूरक व्यवसायाकडे वळण्याची इच्छा वाढू शकते. मात्र, रेशीम शेती ही तातडीने आर्थिक संकटातून बाहेर काढणारी हमखास योजना नाही. त्यासाठी सुरुवातीची गुंतवणूक, तुतीच्या बागेची उभारणी, अळी संगोपनाचे प्रशिक्षण आणि बाजारपेठेशी जोडणी यासाठी वेळ द्यावा लागतो. आधीपासून रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी सध्या तुतीच्या बागा टिकविणे आणि अळीच्या संगोपनासाठी पुरेसे खाद्य उपलब्ध ठेवणे हे प्राधान्याचे विषय आहेत. पाण्याची टंचाई अधिक तीव्र झाल्यास स्थानिक रेशीम विभागाच्या मार्गदर्शनानुसार सिंचनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. नव्याने या व्यवसायात येऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी मात्र उपलब्ध पाणी आणि आर्थिक क्षमता तपासूनच पुढील पाऊल उचलावे.मराठवाड्यातील शेतीसमोर दुष्काळाचे आव्हान उभे असताना रेशीम शेतीसारखे पूरक व्यवसाय शेतकऱ्यांना उत्पन्नाचे पर्यायी मार्ग उपलब्ध करून देऊ शकतात. मात्र, त्यांची यशस्वी अंमलबजावणी पाण्याचे नियोजन, तांत्रिक ज्ञान, दर्जेदार उत्पादन आणि खात्रीशीर बाजारपेठ यांवर अवलंबून आहे. दुष्काळात केवळ पीक बदलण्यापेक्षा उपलब्ध साधनसंपत्तीचा विचार करून शेती आणि पूरक व्यवसायांची सांगड घालणे आवश्यक आहे. तुतीच्या बागेपासून रेशीम कोषापर्यंतची साखळी मजबूत झाली, तर मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती हा केवळ पर्याय न राहता दीर्घकालीन उत्पन्नाचा आधार बनू शकतो.

# संपादकीय

## आंदोलन, लोकशाही आणि संवादाची गरज

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही घटकांचे स्थान महत्त्वाचे असते. सत्ताधारी पक्षावर देशाचा कारभार चालविण्याची जबाबदारी असते, तर सरकारच्या निर्णयांवर लक्ष ठेवणे, त्रुटी दाखवून देणे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणे ही विरोधकांची भूमिका असते. त्यामुळे विरोधकांनी आंदोलन करणे ही लोकशाहीसाठी असामान्य बाब नाही. उलट, लोकशाहीतील असहमती व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य जिवंत असल्याचे ते एक लक्षण मानता येते. मात्र, आंदोलनामागील मुद्दे किती महत्त्वाचे आहेत, त्यांची मांडणी कशी केली जाते आणि त्यावर सरकारची प्रतिक्रिया काय असते, यावर त्या आंदोलनाचे लोकशाहीतील स्थान ठरते.सध्या देशात विरोधी पक्षांनी मतदार याद्यांच्या पुनरीक्षणाच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करीत आंदोलन तीव्र केले आहे. मतदार यादीतून मोठ्या प्रमाणात नावे वगळली गेल्याचा आरोप करीत विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर आक्षेप घेतला आहे. या प्रक्रियेत पात्र मतदारांवर अन्याय होऊ नये, त्यांची नावे चुकीने वगळली गेली असल्यास ती पुन्हा समाविष्ट करावीत आणि संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता असावी, अशा मागण्या पुढे आल्या आहेत. दुसरीकडे, मतदार याद्या अद्ययावत करणे, मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळणे आणि दुबार नोंदी दूर करणे यासाठी पुनरीक्षण आवश्यक असल्याची भूमिका निवडणूक आयोगाने घेतली आहे. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयातही दाद मागितली आहे.या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. मतदार यादी हा निवडणूक प्रक्रियेचा पाया आहे. एखाद्या पात्र नागरिकाचे नाव यादीत नसल्यास त्याचा मतदानाचा अधिकार प्रत्यक्षात बाधित होऊ शकतो. त्याच वेळी, अपात्र किंवा दुबार नोंदी कायम राहिल्यास निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यामुळे मतदार याद्यांची शुद्धता आणि प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची संधी, या दोन्ही गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या आहेत. एका उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी दुसऱ्या उद्दिष्टाकडे दुर्लक्ष होता कामा नये.विरोधकांनी या मुद्द्यावर आवाज उठविणे स्वाभाविक आहे. संसदीय लोकशाहीत प्रत्येक प्रश्नासाठी केवळ सभागृहातील चर्चेवर अवलंबून राहता येत नाही. एखाद्या निर्णयामुळे नागरिकांच्या हक्कांवर परिणाम होत असल्याची विरोधकांना जाणीव झाली, तर त्यांनी जनतेसमोर जाऊन त्याविषयी जागृती करणे आवश्यक ठरते. आंदोलनातून दुर्लक्षित प्रश्न ऐरणीवर येतात, प्रशासनाला उत्तरदायी राहावे लागते आणि निर्णयप्रक्रियेतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी दबाव निर्माण होतो. त्यामुळे आंदोलनाकडे केवळ राजकीय शक्तिप्रदर्शन म्हणून पाहणे हा लोकशाहीचा संकुचित अर्थ ठरेल.मात्र, आंदोलन करणाऱ्या पक्षांनीही आपल्या जबाबदारीचे भान ठेवणे गरजेचे आहे. आंदोलनाची तीव्रता वाढविणे आणि प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित करणे यांत फरक असतो. आरोप करण्यापूर्वी पुरावे मांडणे, नागरिकांमध्ये गैरसमज पसरणार नाहीत याची काळजी घेणे आणि न्यायालयीन किंवा घटनात्मक मार्गांचा योग्य वापर करणे महत्त्वाचे आहे. आंदोलनामुळे वाहतूक, सार्वजनिक सेवा किंवा सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन अनावश्यकपणे विस्कळित होत असेल, तर त्याचा विचारही आंदोलनकर्त्यांनी करायला हवा. लोकशाहीत विरोध करण्याचा अधिकार आहे; पण त्या अधिकाराचा वापर करताना इतरांच्या अधिकारांचा आदर राखणेही तितकेच आवश्यक आहे.

'सह्याद्री'च्या कुशीत

संयोजक: श्री प्रकाश जडे

# भटक्या जमाती...



सध्या सगळीकडे भयाण वातावरण झालेले आहे.. पावसाने गेले कित्येक दिवस सपशेल पाठ फिरवलेली आहे..अशी परिस्थितीत काही ठिकाणी चोरी, दरोड्याच्या घटना घडत आहेत.. माझ्या माहेरी मागील आठवड्यात एका सधन कुटुंबात खूप मोठा दरोडा पडल्याचे मी ऐकले.. पाळत ठेवून पैसे, सोने नाणे इत्यादी वर चोरट्यांनी डल्ला मारलाय.. गनिमत गळ्यावर ठेवलेली सुरी रक्तपात न करता गळा सहीसलामत ठेऊन परत गेली.. नाही तर त्या घरातील लोकांना आपला जीव गमवावा लागला असता..झाल्या प्रकाराची खूप चर्चा नि खलबतं चालू आहेत.. गावात एखाद दोन पारधी कुटुंब आहेत.. त्यातील एक जणाचे म्हणणे की, गावातील लोकांनी त्याला महिन्याकाठी काही रक्कम द्यावी.. जेणेकरून तो असे प्रकार घडू देणार नाही..या प्रकरणात पोलिसांवर पण हल्ला झाला म्हणे.. आणि हल्ली गुन्हेगाराचे प्रमाण इतकं वाढलेय की, पोलीसबळ कमी पडू लागले आहे..

महाराष्ट्रामध्ये पाच लाख भटक्या जमातीचे अस्तित्व होते/आहे.. तर भारतात ६०(लाख गुगल आकडेवारी).. मराठवाड्यातील मी ऐकलेल्या, बघितलेल्या भटक्या जमाती संवर्गातील काही जाती म्हणजे बेलदार,गारुडी, घिसाडी, गोंधळी, नंदीवाले, पांगुळ,वासुदेव, ठाकर, वैदु वडर, भिल्ल ,रामोशी, पारधी, बेरड वंजारी, धनगर इत्यादी.. बेलदार हा समाज दगड फोडणे,घरे बांधणे इत्यादी कामे करत होता. वडर समाजही दगडाचे पाटे-वरवंटे, जाते बनवणे,गोधड्या शिवणे इ.कामे करत होता. गारुडी सापाचे खेळ करून स्वतःचा उदरनिर्वाह चालवत होता. गोंधळी समाजाने लोककला जपली. आणि तेच त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनले. नंदीवाले किंवा तिरमली नंदीबैलाचे खेळ करून एक प्रकारे समाजाचे मनोरंजन करीत. त्याच बरोबर प्राणीमात्रावर दया करण्याचा संदेश त्यांच्याद्वारे समाजात पसरत होता. वैदू, ठाकर, भिल्ल, रामोशी, बेरड,वंजारी, धनगर असा प्रत्येक जण उदरनिर्वाहासाठी काहींना काही काम करत होता. या प्रत्येक जमातीने स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी स्वतःही प्रयत्न केले. असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी या म्हणीप्रमाणे या जमाती फक्त सरकारच्या शिध्याची, सरकारी योजनांची वाट पाहत बसल्या नाहीत.माझ्या लहानपणी आमच्या गावात वडर समाज भरपूर होता.चोरी करणे, दरोडे टाकणे हीच कामे हे लोक त्या काळी करत होते. जंगल्या नावाचा दरोडेखोर पंचकोशीत प्रसिद्ध होता. 'शोले' च्या गब्बर इतकीच जंगल्याची दहशत होती. लेकीबाळी माहेरी येताना गळ्यात सोनंनाणं घालून येत नव्हत्या, कारण होतं जंगल्याची दहशत..



अलकनंदा घुगे आंधळे, संभाजीनगर

जंगल्याची दहशत त्या पिढी बरोबरच संपली. चोऱ्या करण्याची परंपरा संपली. कारण पुढे जंगल्याचा मुलगा जो की, माझा वर्गमित्र आणि मानलेला बंधूही होता/आहे.. तो एकटाच शिकला.जेमतेम सातवी आठवी शिकला असेल. पण पुढे त्याने वडीलांची परंपरा मोडीत काढत कंपनीत नोकरी स्वीकारली.आज तो एका चांगल्या कंपनीत काम करून उदरनिर्वाह चालवत आहे. त्याने गुन्हेगारी कुटुंबात जन्माला आल्याचा शिक्काच पुसून टाकला.गावातील लोकांकडून त्याला आज सन्मानाची वागणूक मिळते. पुढे त्याच्यामुळे त्याचे भाऊबंद ही गुन्हेगारी पासून दूर गेले.त्या समाजासाठी त्याने आदर्श घालून दिला..आमच्या गावात मधोमध पार होता . तिथे भले मोठे लिंबाचे झाड होते. कधी कधी पहाटे गोड गळ्याचे पांगूळ त्या झाडावर बसून गाणे म्हणत असत. मग बाया, माणसे ज्वारी- बाजरी काय जे असेल ते त्याला भिक्षेच्या स्वरूपात देत .वासुदेव डोक्यावर मोर पिसाचा टोप लावून भिक्षा मागत असे. भिल्ल राखुळीने शेळ्या सांभाळत. हल्ली भिल्ल रस्त्याच्या कडेला बसून मध विकतानाही दिसतात. म्हणजेच पोटापाण्यासाठी काही ना काही काम करताना दिसतात. मसणजोगी स्मशानातच राहून मृत व्यक्तीच्या अंतिम संस्काराची तयारी करतात. त्या बदल्यात त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी मोबदला मिळतो. कोल्हाटी समाजात पूर्वी स्त्रिया सुपारी घेऊन वरातीत नाचत. त्यातून त्यांच्यावर वेगळ्या प्रकारचे अन्यायही होत होते. पोटापाण्यासाठी त्यातल्या काहींना वेश्याव्यवसाय करावा लागत होता. आता मात्र हे लोक व त्यांच्या स्त्रिया शहरात कंपन्यांमध्ये कामे करून मूळ चालीरीतीपासून फारकत घेताना दिसत आहेत. बंजारा किंवा बंजारी ही शिकून सुसंस्कृत झाले आहेत. आदिवासी जंगलात राहत होते मात्र लुटमार चोऱ्या यासारख्या मार्गाचा त्यांनी उदरनिर्वाहासाठी अवलंब केल्याचे ऐकीवात नाही. स्वसंरक्षणासाठी किंवा भीतीमुळे क्वचित हल्ला करणे इत्यादी तत्सम प्रकार त्यांच्याकडून घडत होते. वंजारी जमात मूळ राजस्थान मधील असून भटकंती करत करत ती महाराष्ट्रात आली. आणि महाराष्ट्रातच स्थायिक झाली. कष्ट करून हे लोक आता शेती, नोकरी, व्यवसाय इत्यादी मध्ये स्थिर झालेले दिसतात..मी स्वतः या जमातीत जन्मलेली आहे..वर उल्लेख केल्या जाती जमाती आपल्या उदरनिर्वाहासाठी सरकारवर अवलंबून राहिल्या नाहीत. किंवा वाम मार्गाने उदरनिर्वाह करण्याचा मार्ग त्यांनी पत्करला नाही. होते त्या मागास स्थितीतून बाहेर पडण्यासाठी या लोकांनी स्वतःही प्रयत्न केले. समाजाचा विश्वास संपादन केला. शिक्षण मिळवले.. आपल्या आसण्याचा समाजाला कसा उपयोग होईल आणि त्यातून आपल्याला रोजी रोटी कशी मिळेल याचा विचार करून त्या दृष्टीने आपले पाऊल उचलले. आणि स्वतःचे स्थान निर्माण केले. कुठेतरी दोन चार टक्के मिळणाऱ्या सरकारी आरक्षणावर ह्या जमाती विसंबून राहिल्या नाहीत.. निसर्गाने दिलेल्या शरीराचा वापर त्यांनी कष्ट करण्यासाठी केला. याला अपवाद एकच जमात होती.. पारधी..मराठवाड्यातल्या काही भागात या जमातीचे वास्तव्य आढळते.पूर्वी गुन्हेगारी आणि पारधी हे समीकरण ठरलेलं होतं. लुटमार करणारी जमात म्हणून या जमातीची ओळख होती. मराठवाडा आणि तत्सम जिल्ह्यात आजही तशीच ओळख आहे. कष्ट न करता केवळ धाक दाखवून, दहशत पसरून उदरनिर्वाह करणारी जमात अशी या जमाती विषयी लोकांची धारण आहे. त्याला ते स्वतःही तितकेच जबाबदार आहेत. आपल्यावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसला जावा म्हणून त्यांनी स्वतःही प्रयत्न केले नाहीत. शिक्षण घेताना तर हे दिसत नाहीत. मी माझ्या अठरा वर्षाच्या नोकरीमध्ये अजून एकाही पारधी विद्यार्थ्यांचे ॲडमिशन केलेले मला आठवत नाही. कारण हे गावाच्या बाहेर राहणेच पसंद करतात. माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात राहिल्याशिवाय त्याचा विकास होणे शक्य नाही. पण ही जमात गावात स्थिर होणे पसंत करत नाही. आज शेतकऱ्यांना मजूर मिळत नाही. मिळालं तर पुरुष मजुराला पाचशे रुपये तर स्त्री मजुराला ३०० ते ४०० रुपये रोज द्यावा लागतो.



गोदाकाठ...

मजूर म्हणून ही जमात शेतकऱ्याला कधीच उपयोगी पडलेली दिसत नाही. ऐन कापसाच्या दिवसात अजूनही कापूस चोरी गेल्याच्या घटना घडतात.त्यातून शेतकऱ्यांचा या जमातीवर रोष येतो. कष्ट न करता कष्टकऱ्यांच्या तोंडचा घास यांच्या कडून क्वचित हिरावला गेला तर या जमातीचा लोकांकडून, समाजाकडून राग राग होणे साहजिकच आहे. समाजाच्या तिरस्कारला बळी पडायचं नसेल तर या जमातीने आता स्थिर होणे गरजेचे आहे. कष्टाच्या कामाची तयारी ठेवणं, समाजाला उपयोगी पडण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षणाच्या प्रवाहात येणे गरजेचे आहे. स्वतःवरील गुन्हेगारीचा ठपका, शिक्का स्वतःच पुसून काढणं गरजेच आहे.. केवळ सरकारवर अवलंबून न राहता स्वतः ही स्वतःचं अस्तित्व निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणं काळाची गरज आहे अन्यथा काळ कोणासाठी थांबलेला नाही.किंवा ज्यांना कुणाला या लोकांचं शैक्षणिक, वैचारिक, सामाजिक, वैयक्तिक मागासलेपण बघवत नाही त्यांनी तरी या जमातीचा कायापालट होण्यासाठी एखादी चळवळ हाती घेणे गरजेचे आहे. जसं की आमटे कुटुंबीयांनी आदिवासींचा उद्धार केला.. तसा यांनाही कुणीतरी वाली, कैवारी भेटणं आवश्यक आहे..गुन्हेगारी ही कोण्या एका जमातीची मक्तेदारी नसून ती वृत्ती आहे. आणि ती सर्वच समाजातील लोकात आढळते. मात्र इतर समाज स्वतःत सुधारणा, बदल , कायापालट करून घेतोय ..पारधी जमात मात्र जैसे थे स्थितीतच राहणे पसंत करतोय. म्हणून त्यांच्यावरील गुन्हेगारीचा शिक्का पुसला जात नसावा. असे माझे वैयक्तिक मत आहे.


## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

E mail - sdmabad@gmail.com Landline No - 0240-2324100

जाक्र २०२६/संकीर्ण/जमृअ/सीआर-१३५२/कावि-०३ दि.१३/१०/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार:-श्री/ श्रीमती.रिजवाना ताहेर शेख, रा.हीनानगर, शताब्दी नगर, पीछे रशीदपुरा ता.जि.छ.संभाजीनगर**

**विरुध्द**

**गैरअर्जदार:- उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर**

**विषय:- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज**

**संदर्भ:-श्री/श्रीमती.रिजवाना ताहेर शेख रा.हीनानगर शताब्दी नगर पीछे रशीदपुरा ता.जि.छसंभाजीनगर अर्ज दि.१२.०८.२००२६**

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यानी या न्यायालयात जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वयं अर्जदार याचे मुलगा नामे **शेख मोहम्मद शेख ताहेर** यांचा दिनांक ०८/१०/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म/मृत्यु नोंद नोंदवण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती.**रिजवाना ताहेर शेख** यांचे मुलगा नामे **शेख मोहम्मद शेख ताहेर** याची जन्मा नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की अर्जदाराचे सिया मुलगा नामे **मोहम्मद शेख ताहेर** यांचा दिनांक ०८/१०/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, उत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२६ रोजी देण्यात आले आहे.**

**दिनांक: / /२०२६**

**ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.**

स्वाक्षरित/-

**उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता**



## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

E mail - sdmabad@gmail.com Landline No - 0240-2324100

जाक्र २०२६/संकीर्ण/जमृअ/सीआर-७१७/कावि-०३ दि.१३/१०/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार:-श्री/श्रीमती.महेंद्र शांतीलाल पगारे, भरतनगर, डी-सेक्टर, एन-१३ हडको, छत्रपती संभाजीनगर**

**विरूद्ध**

**गैरअर्जदार उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू.छत्रपती संभाजीनगर**

**विषय:- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज**

**संदर्भ:- श्री/श्रीमती.महेंद्र शांतीलाल पगारे, भरतनगर, डी-सेक्टर, एन-१३ हडको छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दि.०७.१०.२०२५**

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांच मुलगा नामे **आदर्श महेंद्र पगारे** यांचा दिनांक २७/०६/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती. **महेंद्र शांतीलाल पगारे** यांचे मुलगा नामे, **आदर्श महेंद्र पगारे** यांचा जन्म नसल्याबाबत उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.म.व छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सूचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगा नामे, **आदर्श महेंद्र पगारे** यांचा दिनांक २७/०६/२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुणालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२६ रोजी देण्यात आले आहे.**

**दिनांक:१३/०३/२०२६**

**ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.**

स्वाक्षरित/-

**उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता**



## उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर

E mail - sdmabad@gmail.com Landline No - 0240-2324100

जाक्र २०२६/संकीर्ण/जमृअ/सीआर-१०१०/कावि-०३ दि.१९/०८/२०२६

### जाहीर प्रगटन

**अर्जदार:-श्री/श्रीमती.असलम खान मुनीर खान पठाण रा.गल्ली नं.१३ अजीज कॉलनी नारेगाव छ.संभाजीनगर**

**विरुध्द**

**गैरअर्जदार उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर**

**विषय:- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज**

**संदर्भ: श्री/श्रीमती.असलम खान मुनीर खान पठाण,रा.गल्ली नं १३ अजीज कॉलनी नारेगाव छ.संभाजीनगर याचा अर्ज दि.१३.०७.२०२६**

विषयाकींत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगी नामे, **मरयम असलम खान** यांचा दिनांक २७/०६/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार श्री/श्रीमती.**असलम खान मुनीर खान पठाण** यांचे मुलगी नामे, **मरयम असलम खान** पाची जन्म नोंद नसल्याबाबत उपनिबंधक, जन्ममृत्यू नोंदणी विभाग, महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर उपनिबंधक, जन्म-मृत्यू नोंदणी विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचं सिया मुलगी नामे, **मरयम असलम खान** यांचा दिनांक २७/०६/२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथ जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

**सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२६ रोजी देण्यात आले आहे.**

**दिनांक: / /२०२६**

**ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.**

स्वाक्षरित/-

**उप विभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता**





चित्रकार :- प्रियांश प्रविण जडे (इयत्ता ३ री)

## दुष्काळामध्ये पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य

अल निनोच्या प्रभावामुळे तसेच हवामानातील बदलामुळे मन्सूनच्या पावसात मोठी घट झाली आहे, राज्यात सरासरी १३ टक्के पेक्षा जास्त पाऊस कमी पडला आहे. कमी पाऊस व पावसातील खंड यामुळे जलसाठ्यानी आताच तळ गाठला आहे . विदर्भात २३ टक्के तर मराठवाड्यात ४० टक्के सरासरीपेक्षा कमी पावस झाल्यामुळे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिंचन प्रकल्प तसेच उपलब्ध जलसाठ्याचे काटकसरीने नियोजन करून उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.पिण्याच्या पाण्याची सुरक्षितता निश्चित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फ्डणवीस यांनी जिल्हा प्रशासनाला सक्त सूचना दिल्या आहेत. दिनांक ३१ ऑगस्ट २०२७पर्यत पिण्याच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले आहे.नागपूर विभागातील सर्वच जलसाठ्यामध्ये मागील वर्षाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. मोठ्या जलसाठ्यांमध्ये २३ टक्के पेक्षा जास्त घट झाली आहे. यामध्ये नागपूर , नागपूर वर्धा भंडारा चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यातील जलसाठ्याचा समावेश आहे .मध्यम प्रकल्पामध्ये सुद्धा सरासरी १६ टक्के पेक्षा जास्त जलसाठ्यात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाल्यामुळे उन्हाळ्यामध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तातडीच्या आवश्यक उपाययोजना लागू केल्या आहेत, पिण्याच्या पाण्याची उपलब्ध उपलब्धता अबाधित राहावी तसेच जनावरांना साठी आवश्यक पाण्याची व्यवस्था निश्चित करण्यासाठी सिंचन प्रकल्प निहाय पाण्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे त्यानुसार जिवंत पाणी साठ्यापैकी किमान दहा टक्के साठा आपत्कालीन साठा म्हणून राखून ठेवण्यात येणार आहे.महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात उपलब्ध पाण्याची काटकसरीने वापर करून पाण्याची होणारी गळती थांबवण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्री.ए.ए.पांडे साहेब सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर खुलताबाद यांच्या न्यायालयात

एम.ए.आर.जे.आय.नं.२०३/२०२६ पु.ता.१९/११/२०२६

अर्जदार:–
१) बाळकृष्ण पि.दीपक दामोधर, वय ३८ वर्ष, धंदा:मजुरी, रा.वेरुळ, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद,
२) जयदेव पि.दीपक दामोधर, वय ३६ वर्ष, धंदा:शेती, रा.वागली, ता.चाळीसगाव, जि.जळगाव,
३) जयभिम पि.दीपक दामोधर, वय ३४ वर्ष, धंदा:शेती, रा.वेरुळ, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद,

विरुद्ध

गैरअर्जदार:– निरंक
विषय:– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्या अर्थी, उपरोक्त अर्जदारांनी मा.न्यायालयात **ॲड.विजय के राठोड** यांच्या मार्फत अर्ज केला आहे की, अर्जदार यांची आई नामे **सुभद्राबाई भ्र.दिपक दामोधर** यांचा मृत्यू दिनांक ०१/०५/२०२४ रोजी आयकॉन स्पेशलिटी औरंगाबाद येथे झालेला आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत **सुभद्राबाई भ्र.दिपक दामोधर** यांचे मुले आहे. मयताचे आई वडिल व पती हे फार वर्षापुर्वी मयत झालेले असुन अर्जदारांकडे ते मयत झाल्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. मयतास अर्जदार यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदार हेच मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहे. अर्जदार हे मयत **सुभद्राबाई भ्र.दिपक दामोधर** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना त्यांच्या मृत्यूनंतर शासकीय निमशासकीय कामासाठी तसेच महसूल विभागात वारस कार्यवाही दाखल करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी, या जाहीर नोटसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या नावे ते मयताचे वारसदार असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणास उजर अथवा आक्षेप असेल त्यांनी सदर जाहिर प्रगटन प्रसिद्धिपासून ३० दिवसांच्या आत या मा. न्यायालयात लेखी नोंदवावा. मुदतीत जर कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे ते मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप, ग्राहय धरला जाणार नाही. करीता आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्रीमती एम.ए.के.शेख मॅडम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.२०१/२०२६ पु.ता.०७/१२/२०२६

अर्जदार : विठ्ठल पि.शंकरराव अधाने वय ७५ वर्षे, धंदा:शेती रा.विरमगाव, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार:– ग्रामपंचायत विरमगाव, तर्फे ग्रामसेवक ग्रामपंचायत विरमगाव, ता.खुलताबाद, जि छ.संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.बी.बी.नलावडे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नामे **विठ्ठल पि. शंकरराव अधाने** यांचा जन्म दिनांक १८/०६/१९५० रोजी विरमगाव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांच्याकडे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उंजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्रीमती एम.ए.के.शेख मॅडम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.११९/२०२६ पु.ता.०५/१२/२०२६

अर्जदार:–विजय पि.पुंडलिक होळकर वय ३१ वर्षे, धंदा:शेती. रा.ममनापूर, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार:–ग्रामपंचायत भडजी/ममनापुर, ग्रामपंचायत भडजी/ममनापुर, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर
विषय:–कलम १३ (३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.बी.बी.नलावडे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नामे **विजय पि.पुंडलिक होळकर** यांचा जन्म १०/०५/१९९५ रोजी ममनापुर, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर येथे झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांच्याकडे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्रीमती एम.ए.के.शेख मॅडम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.१७३/२०२६ पु.ता.१३/१२/२०२६

अर्जदार:–वैजीनाथ पि.कडूबा म्हस्के वय ४३ वर्षे, धंदा:शेती रा.कनकशिळ, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार:– ग्रामपंचायत कनकशिळ/इंदापूर, ग्रुप–ग्रामपंचायत तर्फे ग्रामसेवक कनकशिळ/इंदापूर, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.डी.पी.काळे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराची मुलगी नामे **पायल पि.वैजीनाथ म्हस्के** हिचा जन्म दिनांक २६/०१/२००९ रोजी कनकशिळ, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या मुलीची जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांच्याकडे मुलीचे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची मुलीची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची मुलीची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची मुलीची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्री.ए.ए.पांडे साहेब प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.२०२/२०२६ पु.ता.२४/११/२०२६

अर्जदार:–रोहित पि.अनिल साळुंके वय २० वर्षे, धंदा:शिक्षण रा.सोबलगाव, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद

विरूद्ध

गैरअर्जदार:– ग्रामपंचायत सोबलगाव/पाडळी. तर्फे ग्रामसेवक ग्रामपंचायत सोबलगाव/पाडळी, ता.खुलताबाद, जि छ.संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.अनिल एस नलावडे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे अर्जदार नामे **रोहित पि.अनिल साळुंके** यांचा जन्म दि.०१/०६/२००५ रोजी अर्जदाराच्या आई वडिलांच्या राहत्या घरी सोबलगाव, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर या गावी झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांचे जन्म प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे प्रमाणपत्र अर्जदारास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्री.ए.ए.पांडे साहेब प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.१९८/२०२६ पु.ता.२३/११/२०२६

अर्जदार:–राजू पि.मच्छिंद्र सोनवणे वय ३७ वर्षे, धंदा:मजुरी रा.भिलवाडा खुलताबाद,ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर

विरूद्ध

गैरअर्जदार:– मुख्याधिकारी नगरपरिषद खुलताबाद, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.डी.पी.काळे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे वडिल नामे **मच्छिंद्र पि.बाबु सोनवणे** यांचा मृत्यू दिनांक १८/०५/२००३ रोजी राहत्या घरी भिलवाडा खुलताबाद, ता. खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर येथे झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या आजीची मृत्यू नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांच्याकडे आजीचे मृत्यू प्रमाणपत्र उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची आजीची मृत्यूची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची आजीची मृत्यू नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे मृत्यू प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची आजीची मृत्यू नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे मृत्यू प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्रीमती एम.ए.के.शेख मॅडम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.१८३/२०२६ पु.ता.०४/१२/२०२६

अर्जदार :– नुसरत पि.हमीद पटेल, नुसरत भ्र.अयाज शेख) वय २२ वर्षे, धंदा:घरकाम, रा.अगर कानडगाव, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

विरुद्ध

गैरअर्जदार:– ग्रुप ग्रामपंचायत कसाबखेडा, तर्फे ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत कसाबखेडा, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.अब्बास पटेल** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे अर्जदार नामे **नुसरत पि.हमीद पटेल (नुसरत भ्र.अयाज शेख)** हिचा जन्म **दि.०२/०९/२००४** रोजी अर्जदाराच्या आई वडिलांच्या राहत्या घरी कसाबखेडा, ता. खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर या गावी झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांचे जन्म प्रमाणपत्र त्यांच्याकडे उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

## जाहीर प्रगटन

### खुलताबाद येथील श्रीमती एम.ए.के.शेख मॅडम प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी खुलताबाद यांच्या न्यायालयात

फौ.किरकोळ अर्ज क्र.१७१/२०२६ पु.ता.०३/१२/२०२६

अर्जदार:–केशव पि.वाळुबा ऊर्फ बाळाजी चौधरी वय ५० वर्षे, धंदा नोकरी, रा.गदाना, ता.खुलताबाद, जि.छ.संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार:– ग्रामपंचायत अधिकारी ग्रुप–ग्रामपंचायत गदाना/बोरवाडी, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर
विषय:–कलम १३(३) जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ प्रमाणे अर्ज.

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात **ॲड.डी.पी.काळे** यांच्या मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नामे **केशव पि.वाळुबा ऊर्फ बाळाजी चौधरी** यांचा जन्म दिनांक ०१/०७/१९७६ रोजी गदाना, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर येथे झालेला आहे. अर्जदार यांनी आजपर्यंत त्यांच्या जन्माची नोंद कोठेही केलेली नाही त्यामुळे त्यांच्याकडे जन्म प्रमाणपत्र उपलब्ध नाही. अर्जदार व त्यांचे कुटुंब यांना कायद्याबाबत माहिती नसल्याने त्यांच्याकडून अनावधानाने अर्जदाराची जन्माची नोंद करणे राहून गेलेली आहे. करिता गैरअर्जदार यांना आदेशीत करुन जन्म नोंद घेणे बाबत सदरहू प्रकरण मा. न्यायालयात दाखल केलेले आहे.

त्याअर्थी, या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील नमुद प्रमाणे अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेउन तसे जन्म प्रमाणपत्र अर्जदारास देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारांना देणेबाबत ज्या कोणास उजर आक्षेप असल्यास त्यांनी आपला उजर आक्षेप सदरील प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मुळ कागदपत्रांसह या न्यायालयात नोंदवावा. जर कोणाचा उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराची जन्म नोंद गैरअर्जदाराच्या अभिलेखात घेऊन तसे जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत गैरअर्जदारांना आदेशीत करण्यात येईल व मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

करिता आज दिनांक १३/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित/– **क.लिपीक** | कोर्टाचा शिक्का | स्वाक्षरित/– **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय क.स्तर, खुलताबाद.

# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत मुक्तानंद महाविद्याल संघाचा प्रथम क्रमांक!

**गंगापूर प्रतिनिधी:**

क्रीडा अधिकारी यांच्या अंतर्गत आयोजित तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. खेळाडूंनी सांघिक भावना, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर हे यश संपादन केले. या यशाबद्दल महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण असून, खेळाडूंवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.या विजयी संघात आदित्य चव्हाण,अनिकेत घोटकर, कार्तिक चव्हाण,करण चव्हाण,सौरभ भंडारे,ओंकार चव्हाण,सोहम जाधव,वैभव पंडित,रोहित खंडारे,आदित्य थोरात आणि समर्थ साबणे या खेळाडूंचा समावेश होता. या सर्व खेळाडूंचे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाशदादा साळुंखे,सरचिटणीस सतीश चव्हाण, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य माननीय ड.लक्ष्मणराव मनाळ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे.चव्हाण, उपप्राचार्य डॉ.वैशाली बागुल,



डॉ.विशाल साबणे,प्रवेरक्षक डॉ.हरिराम सातपुते,क्रीडा विभागाचे डॉ.फिरोज सय्यद, प्रा.संदीप गायके,प्रा.श्रीराम नगर,प्रा.सचिन सोळुंके,प्रा.गोकुळ निळ,प्रा. गणेश वराडे,प्रा. प्रकाश वाहूळ,प्रा. रमेश मानकर आणि प्रा.स्वप्निल डावकर यांनी अभिनंदन केले. तसेच आगामी स्पर्धांसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.या संघाला कनिष्ठ विभागातील क्रीडा विभागाचे प्रा. सचिन हजारे यांचे मार्गदर्शन लाभले.

आजचा रंग:निळा



वांद्रे, मुंबई : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) सांघिक कार्यालयातील महिला अधिकारी व कर्मचारी.

# घरकुल लाभार्थ्यांसाठी तीन वाळू घाट आरक्षित ठेवण्याची मागणी

**सभापती कविता चव्हाण,उपसभापती राजेश्वर हिवाळे यांचे तहसीलदारांना निवेदन पात्र लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू मोफत देण्याची मागणी**




**गंगापूर प्रतिनिधी:**गंगापूर तालुक्यातील प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना तसेच इतर शासकीय घरकुल योजनांतील पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार प्रत्येकी पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्यासाठी चिंचखेडा, आगाठाण आणि मालुंजा शिवारातील वाळू घाट आरक्षित ठेवावेत, अशी मागणी पंचायत समितीच्या सभापती सौ. कविता रविंद्र चव्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी तहसीलदार, गंगापूर यांना निवेदन दिले आहे.

गंगापूर तालुक्यातील अनेक गरीब व गरजू कुटुंबांना स्वतः चे हक्काचे घर उभारण्यासाठी शासनाच्या घरकुल योजनांचा आधार मिळत आहे. मात्र, वाळूची अपुरी उपलब्धता तसेच वाहतूक आणि वितरणातील अडचणींमुळे घरांचे बांधकाम पूर्ण करताना लाभार्थ्यांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे घरकुल योजनांचा उद्देश साध्य करण्यासाठी वाळूचा पुरवठा सुरळीत करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. चिंचखेडा,आगाठाण आणि मालुंजा शिवारातील वाळू घाट घरकुल लाभार्थ्यांसाठी आरक्षित ठेवून शासनाच्या प्रचलित नियम व अटींनुसार वाळू उत्खनन, वितरण आणि वाहतुकीचे नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.गरीब लाभार्थ्यांच्या घरांचे बांधकाम वेळेत पूर्ण व्हावे, यासाठी प्रशासनाने या मागणीवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही सभापती चव्हाण यांनी निवेदनात म्हटले आहे.यावेळी पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर हिवाळे यांचाही या मागणीसाठी पुढाकार आहे.

# मनरेगाच्या थकीत बिलांसाठी मंत्री गोगावले यांची भेट

**गंगापूर तालुक्यात ३५ कोटींची बिले प्रलंबित आमदार रमेश बोरणारे,उपसभापती राजेश्वर हिवाळे यांचे निवेदन**



**गंगापूर प्रतिनिधी:**
गंगापूर तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) पूर्ण झालेल्या विविध विकासकामांची तब्बल ३५ कोटी ३ लाख ७३ हजार रुपयांची बिले गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रलंबित आहेत. एकूण २ हजार ७६३ कामांची रक्कम थकीत असल्याने शेतकरी, मजूर आणि लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.या प्रकरणी पंचायत समितीचे उपसभापती राजेश्वर कल्याण हिवाळे यांनी रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडे निवेदनाद्वारे थकीत रक्कम तातडीने मंजूर करण्याची मागणी केली आहे.

गंगापूर तालुक्यात मनरेगाअंतर्गत जनावरांचे गोठे, वैयक्तिक सिंचन विहिरी,शेततळी,फळबाग लागवड, वृक्षलागवड, मातोश्री पाणंद रस्ते आणि सिमेंट रस्त्यांसह विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत. मात्र, या कामांची कुशल बिले, साहित्याची देयके तसेच शेतकरी व मजुरांचे पेमेंट अद्याप मिळालेले नाही.सध्या तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आणि मजूर आर्थिक संकटाचा सामना करीत आहेत. एकीकडे रोजगाराची कमतरता,तर दुसरीकडे केलेल्या कामाचा मोबदला मिळत नसल्याने त्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.या गंभीर परिस्थितीची दखल घेऊन शासनाने प्रलंबित देयके तातडीने मंजूर करून संबंधित लाभार्थ्यांना वितरित करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी उपसभापती राजेश्वर हिवाळे यांनी केली आहे.

जिल्हा बँकांना शेषराव नाना जाधव यांची सरप्राईज व्हिजिट'!

# कर्जमाफी, ई-केवायसीचा घेतला आढावा; शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



**गंगापूर प्रतिनिधी:**गंगापूर तालुक्यातील वाळूज, तुर्काबाद आणि खराडी येथील औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांना बँकेचे संचालक तथा लासूर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शेषराव नाना जाधव यांनी मंगळवारी दि.१३ ऑक्टोंबर रोजी अचानक भेट देत कर्जमाफी आणि ई-केवायसी प्रक्रियेचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी शेतकरी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून कर्जमाफीसंदर्भातील अडचणी जाणून घेतल्या.

कर्जमाफी योजनेचा लाभ मिळवताना शेतकऱ्यांना कोणत्या अडचणी येत आहेत, ई-केवायसीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत, याबाबत जाधव यांनी सविस्तर माहिती घेतली. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे, तसेच प्रलंबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे,अशा सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. यावेळी शेतकऱ्यांनीही आपल्या अडचणी आणि सूचना मांडल्या. दरम्यान, वाळूज येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या कार्यालयालाही जाधव यांनी भेट दिली.संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या कर्जाची माहिती घेत त्यांनी प्रलंबित ई-केवायसी पूर्ण करून घेण्यावर भर दिला. कर्जमाफीच्या प्रक्रियेत पात्र शेतकऱ्यांना अडचणी येऊ नयेत, यासाठी बँक आणि सहकारी संस्थांनी समन्वयाने काम करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.यावेळी नंदकुमार गांधीले, ज्ञानेश्वर पाटील बोरकर,सबजर पटेल,युसुफ पटेल,शंकर बापू कुंजर, बाबासाहेब शिंदे,अशोकराव हिवाळे,उदय पाटील,रमेश सोळुंके,ए.बी.ढोले,ए.व्ही.रिठे,प्रमोद पोळ,एच.के. जाधव,कृष्णा एडके, शाखाधिकारी राठोड, बी.बी. राजपूत आदी उपस्थित होते.

# कृषिपंपांच्या सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण प्रत्येक जिल्ह्यात 'मिशन मोड'वर

**नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदला:अध्यक्ष लोकेश चंद्र यांचे आदेश**

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** दुष्काळी परिस्थितीत राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यात १ हजार नवीन वितरण रोहित्र व स्पेशल डिझाईन 'ट्रान्सफॉर्मर' तसेच कॅपॅसिटर बँक' खरेदीसाठी जिल्हानिहाय २० कोटींच्या निधीस मंजुरी दिली आहे. या सर्व कामांची युद्धपातळीवर अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सोमवारी (दि. १२) सर्व जिल्ह्यांचा आढावा घेतला आणि ही सर्व कामे 'मिशन मोड'वर पूर्ण करण्याचे आदेश दिले.
मुंबई येथील 'प्रकाशगड' मुख्यालयात आयोजित बैठकीमध्ये अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी प्रत्येक जिल्ह्यातील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके बुधवार (दि. १४) पर्यंत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले. या निधीमधून होणाऱ्या वीजयंत्रणेच्या सक्षमीकरणाच्या कामात कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही तसेच नादुरुस्त किंवा बंद पडलेले रोहित्र तातडीने बदलण्यात यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी संचालक श्री. धनंजय औंढेकर (संचालन), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. सचिन तालेवार (प्रकल्प), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) यांच्यासह कार्यकारी संचालक तसेच सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंते व अधीक्षक अभियंते उपस्थित होते.
मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने कृषिपंपांना आणि कृषी वीजवाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांना सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी प्रत्येक जिल्हयासाठी २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून दिला आहे. या निधीतून आवश्यकतेनुसार विद्यमान ६३ केव्हीएऐवजी १०० केव्हीए क्षमतेचे तसेच अतिरिक्त सिंगल पोल रोहित्र उभारण्यात येणार आहे. यासोबतच कृषी वाहिनीवरील घरगुती ग्राहकांना २४ तास वीजपुरवठा करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी 'स्पेशल डिझाईन रोहित्रे' (एसडीटी) बसविण्यात येणार आहेत. तर योग्य दाबाने व सुरळीत वीजपुरवठ्यासाठी उपकेंद्रांमध्ये आणि वीजवाहिन्यांवर आवश्यकतेनुसार नवीन कपॅसिटर बँक्स बसविण्यात येणार आहेत.विशेष निधीमधील सर्व प्रस्तावित कामांची अंदाजपत्रके संबंधित अधीक्षक अभियंत्यांनी दि. १४ ऑक्टोबरपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करावेत.



दुष्काळी परिस्थितीत रोहित्र बिघाड व इतर तातडीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी २४ तास सुरु असणारी स्वतंत्र हेल्पलाईन सुरू करण्याचे निर्दे श यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी दिले. राज्य शासनाच्या विशेष निधीमधून केवळ कृषीपंपांचा आणि कृषी वाहिन्यांवरील घरगुती ग्राहकांचा वीजपुरवठा सक्षम करण्यासाठीच कामे प्रस्तावित करावीत. या निधीचा अन्यत्र वापर करू नये असे संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी स्पष्ट केले. चालू रब्बी हंगामातच शेतकऱ्यांना सुरळीत व दर्जेदार वीज मिळेल यासाठी ही कामे निर्धारित गुणवत्ता व तांत्रिक मानकांचे तंतोतंत पालन करून वेळेत पूर्ण करा असे निर्देश त्यांनी दिले. याबाबत मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक क्षेत्रीय कार्यालयांना यापूर्वीच निर्गमित करण्यात आल्याचे संचालक श्री. धनंजय औंढेकर यांनी यावेळी सांगितले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

# 'कर्जमुक्ती'चा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरण तातडीने पूर्ण करा: जिल्हा उपनिबंधकांचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६ योजनेत कर्जमुक्तीला पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांची यादी दि.१२ रोजी प्रसिद्ध झाली आहे. त्यानुसार आतापर्यंत एकूण याद्या मिळून जिल्ह्यात १ लाख ४६ हजार ३७१ शेतकऱ्यांची नावे आहेत. त्यापैकी १ लाख ५ हजार २०१ शेतकऱ्यांचेच आधार प्रमाणीकरण झाले आहे. अद्याप ४१ हजार १७० शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. त्यांनी ते त्वरीत करावे असे आवाहन जिल्हा उपनिबंधक समृत जाधव यांनी केले आहे.
जिल्ह्यात प्रसिद्ध झालेल्या चौथ्या यादीत १९ हजार १४० पात्र शेतकऱ्यांची नावे आहेत. दि. १२ रोजी प्रसिद्ध झालेल्या चौथ्या यादीतील कर्जखात्यांसह जिल्ह्यात एकूण १ लाख ४६ हजार ३७१ शेतकऱ्यांची नावे आहेत. त्यापैकी १ लाख ५ हजार २०१ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण पूर्ण केले आहे. अद्याप ४१ हजार १७० शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण बाकी आहे. आधार प्रमाणिकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात शासन स्तरावरून ऑनलाइन पद्धतीने अनुदानाची रक्कम जमा करण्यात येते.आतापर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २९ हजार ८२२ कर्जखात्यांमध्ये १४२.९७ कोटी रुपये, तर इतर बँकांच्या ६३ हजार ४४६ कर्जखात्यांमध्ये ५५५.९६ कोटी रुपये, अशी एकूण ९३ हजार २६८ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ३९८.९३ कोटी रुपये जमा होऊन त्यांची कर्जखाती निरंक थकबाकी करण्यात आली आहेत, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक यांनी दिली आहे.

**आधार प्रमाणिकरण तातडीने करणे आवश्यक**

पोर्टलवर प्रसिद्ध झालेल्या याद्या सर्व तालुक्यांतील गावपातळीवरील संबंधित बँक शाखा, विकास संस्था, आपले सरकार सेवा केंद्र, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयांत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.योजनेचा लाभ मिळवण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रात जाऊन आधार प्रमाणिकरण तातडीने पूर्ण करावे. आधार प्रमाणिकरण करणे आवश्यक व बंधनकारक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी विलंब न करता ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी केली आहे.आधार प्रमाणिकरण करण्यापूर्वी शेतकऱ्यांनी प्रसिद्ध झालेल्या यादीत आपले नाव समाविष्ट असल्याची खात्री करावी. तसेच आधार प्रमाणिकरणासाठी जाताना अँग्रीस्टॅक क्रमांक, मूळ आधार कार्ड आणि बचत खात्याचे पासबुक सोबत ठेवावे.अधिक माहितीसाठी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर तसेच उपनिबंधक व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयांशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# दुष्काळी परिस्थितीत मजुरांना गावातच काम उपलब्ध करून द्या!

**अपूर्ण कामे दोन दिवसांत सुरू करण्याचे सभापती कविता चव्हाण यांचे निर्देश**



**गंगापूर प्रतिनिधी:**गंगापूर तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर मागणीनुसार रोजगार उपलब्ध करून द्यावा, तसेच अपूर्ण कामे तातडीने सुरू करावीत, असे निर्देश पंचायत समितीच्या सभापती सौ. कविता रविंद्र चव्हाण यांनी दिले.

मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीमध्ये व्ही. बी. जी. राम. जी. अंतर्गत कार्यरत सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहाय्यक आणि संगणक परिचालक यांची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळ निवारणाच्या दृष्टीने रोजगार उपलब्धतेचा आढावा घेण्यात आला.प्रत्येक ग्रामपंचायतीअंतर्गत कामाची मागणी करणाऱ्या मजुरांना तातडीने काम उपलब्ध करून देण्याबाबत दक्षता घ्यावी. रोजगाराअभावी मजुरांचे स्थलांतर होणार नाही, यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना सभापती चव्हाण यांनी दिल्या. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांचे हजेरी पत्रक प्राधान्याने निर्गमित करण्याचेही निर्देश देण्यात आले.याशिवाय, पुढील दोन दिवसांत सर्व अपूर्ण कामे सुरू करून ती पूर्ण करण्यासाठी संबंधित ग्रामरोजगार सहाय्यकांना आवश्यक सूचना द्याव्यात. लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांना कामे सुरू करण्यासाठी प्रवृत्त करावे आणि त्यांच्या अडचणी सोडवाव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.या बैठकीस पंचायत समिती सदस्य सुनील सर्जेराव पाखरे आणि गटविकास अधिकारी सुहास वाकचौरे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# रताळी,कच्ची केळी,शेंगदाणे, शिंगाड्याला पसंती

**छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी :** नवरात्रोत्सवाला सुरुवात झाल्याने शहरातील बाजारपेठांमध्ये उपवासाच्या पदार्थांच्या खरेदीची लगबग वाढली आहे. नऊ दिवस उपवास करणाऱ्या भाविकांकडून रताळी, कच्ची केळी, भुईमूग शेंगा, शिंगाडे आणि विविध फळांना पसंती दिली जात आहे. त्यामुळे औरंगपुरा, शहागंज, टीव्ही सेंटर आणि मुकुंदवाडी येथील बाजारपेठांमध्ये उपवासाचे साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची वर्दळ वाढली आहे. मात्र, उपवासाच्या पदार्थांसोबतच रोजच्या स्वयंपाकासाठी लागणाऱ्या भाजीपाल्याचे दरही वाढल्याने सर्वसामान्यांच्या घरखर्चात भर पडली आहे. नवरात्रात अनेक कुटुंबांमध्ये नेहमीच्या आहाराऐवजी उपवासाचे पदार्थ खाण्याला प्राधान्य दिले जाते. त्यामुळे या काळात कंदमुळे, फळे आणि फराळाच्या साहित्याला विशेष मागणी असते. यंदाही बाजारपेठांमध्ये रताळी, कच्ची केळी, भुईमूग शेंगा आणि शिंगाडे खरेदी करण्याकडे ग्राहकांचा कल आहे. उपवासासाठी आवश्यक असलेल्या पदार्थांची खरेदी करताना नागरिकांकडून दरांचीही चौकशी केली जात आहे.नवरात्रात अनेक घरांमध्ये कांदा, लसूण आणि काही नेहमीच्या भाज्या खाणे टाळले जाते. त्यामुळे या पदार्थांची मागणी तुलनेने कमी होते. मात्र, बाजारातील आवक घटल्याने भाजीपाल्याचे दर चढेच असल्याचे चित्र आहे. टोमॅटोचे दर किलोमागे ३० ते ४० रुपयांवरून ५० रुपयांपर्यंत पोहोचले आहेत.


**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHENGE IN MY NAME FOR PASSPORT ISSUANCE
OLD NAME
**TAHEZIBUNNISA**
NEW NAME
**TAHEZIBUNNISA AMEENODDIN KAZI**
PRESENT **ADDRESS:LANE NO.2, NEAR RASHID KIRANA DUKAN,, GARKHEDA GAON, AURANGABAD, AURANGABAD, MAHARASHTRA -431001**

**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
**FAROOQUI SUGRAJHANARA NISAR**
TO
(NEW NAME)
**SUGRAJHANARA SAYYAD SANAULLAH RAZVI**
AS PER MY DOCUMENTS
**ADD: PLOT NO 30 SURVEY NO 30/1/2 LANE 2 KOLTHANWADI, ROAD, KAISAR PARK, HARSUL, AURANGABAD, MAHARASHTRA**

**दैनिक सह्याद्री टाइम्स**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM
(OLD NAME)
**1) SHAIKH AIDAN AHMED**
**2) SHAIKH AIDAN AHMED ANIS AHMED**
TO
(NEW NAME)
**AIDAN AHMED SHAIKH**
**ANIS AHMED SHAIKH**
AS PER MY DOCUMENTS
**ADD: H NO.112 MOHALLA FARSH KHULDABAD AURANGABAD 431101**


# मतमोजणी केंद्रातील सुरक्षा सुविधांचा विभागीय आयुक्त जी.श्रीकांत यांच्याकडून आढावा

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:**
----------------

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज चिकलठाणा येथील कलाग्रामसमोरील मोकळ्या जागेत उभारण्यात आलेल्या मतमोजणी केंद्राची पाहणी करून सुरक्षा व्यवस्था व आवश्यक सुविधांचा आढावा घेतला.यावेळी त्यांनी सीसीटीव्ही यंत्रणा, मतपेट्या ठेवण्याची व्यवस्था, मतमोजणी कक्ष, वीजपुरवठा व पर्यायी वीज व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका तसेच उमेदवारांच्या प्रतिनिधींसाठी उपलब्ध सुविधांची माहिती घेतली. मतमोजणी प्रक्रियेत वीजपुरवठ्यामुळे कोणताही व्यत्यय येऊ नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.
मतमोजणीच्या दिवशी अधिकारी, कर्मचारी व उमेदवारांच्या प्रतिनिधींना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रवेश व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे आणि अन्य मूलभूत सुविधांची पूर्तता वेळेत करावी. तसेच सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून मतमोजणी केंद्रावरील आवश्यक व्यवस्था सज्ज ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम.महानगरपालिका आयुक्त अमोल ऐडगे, पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्यासह निवडणुकीशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# श्री जुन्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील पूजा म्हस्के हिची राज्यस्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड

**छत्रपती संभाजीनगर,प्रतिनिधी:** विभागीय क्रीडा संकुल,छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेत श्री जुन्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनी कु. पूजा म्हस्के हिने अप्रतिम योगासनांची प्रात्यक्षिके करून विजेतेपद पटकाविले. या कामगिरीमुळे तिची विभागीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश पाळवदे यांची उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते पूजाला सुवर्णपदक देण्यात आले. त्याचबरोबर याआधी झालेल्या तालुकास्तरीय योगासन स्पर्धेतही या विद्यालयाने चोख कामगिरी बजावली असून १४ वर्षाखालील गटातून वैष्णवी दांडगे द्वितीय क्रमांक व १९ वर्षाखालील गटातून विकास राठोड यानेही द्वितीय क्रमांक मिळवत पदक पटकावले आहे . या स्पर्धेचे सर्व परीक्षक, उपस्थित प्रशिक्षक, विद्यार्थी या सर्वांनी कौतुक केले. या यशाबद्दल पुजा, तिचे पालक व तिचे मार्गदर्शक कैलास कुबेर यांचे पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजस्थान राज्याचे महामहिम राज्यपाल श्री.हरिभाऊजी बागडे, उपाध्यक्ष श्री देवजीभाई पटेल, सचिव श्री निवृत्ती गावंडे, संस्थेचे सर्व संचालक, शालेय समिती अध्यक्ष श्री शेखर दांडगे, सर्व शालेय समिती सदस्य, प्रशाळेचे मुख्याध्यापक श्री भगवान उबाळे,



माजी मुख्याध्यापक विठ्ठल वायाळ, पर्यवेक्षिका सौ.सीमा मुंढे, मार्गदर्शक शिक्षक रविंद्र जाधव, प्राध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

THIS NEWSPAPER IS PUBLISHED BY **ARCHANA SANDEEP KALE** FROM PLOT NO.489, SAMARTH KRUPA, N-1/F, BEHIND GARWARE STADIUM, NEAR POWER HOUSE, TOWN CENTER CIDCO, CHHAPTRAPATI SAMBHAJINAGAR (M.S.) 431003 ON BEHALF OF **ARCHANA SANDEEP KALE** EDITED BY **ARCHANA SANDEEP KALE** AND PRINTED BY **ARCHANA SANDEEP KALE** AT MANASI PRINTERS, PLOT NO. 45A, SERVICE INDUSTRY SECTOR, CHHATRAPATI SAMBHAJI NAGAR, MAHARASHTRA - ■ **Mob. No: 8459270916** ■ **Email-sahyadritimesaura@gmail.com** ■ **RNI No. MAHMAR/2003/10715**